ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052 (UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

Golden Research Thoughts

गडकऱ्यांनी 'राजसंन्यास' नाटकात निर्माण केलेली संभाजी राजांची अनैतिहासीक प्रतिमा

सोमवंशी गिरीधर नागोराव
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा .

प्रस्तावना :-

मराठी वाङमयामध्ये ऐतिहासिक नाटकामध्ये सर्वांत जास्त नाटक कोणत्या राजाच्या जीवनावर लिहली गेलीवर ती छत्रपती संभाजी महाराजावर आहेत. जवळपास साठ पेक्षा अधिक नाटेके त्याच्यां जीवनावर लिहली गेलीत. त्यामध्ये सुरुवातीच्या कालखंडातील जी नाटक संभाजी राजांच्या जीवनावर लिहली गेली. त्यामध्ये संभाजी राजांची अनैतिहासिक प्रतिमा निर्माण केली गेली. त्यामध्ये राम गणेश गडकऱ्याचे 'राजसंन्यास' हे एक महत्वाचे नाटक आहे.राम गणेश गडकरी यांनी संभाजी राजांच्या जीवनावर 1922 मध्ये 'राजसन्यांस' हे नाटक लिहीले. 'एक तत्वगर्भ नाटक म्हणून गडकऱ्यांनी राजसन्यांसाची आखणी केली आहे. शोकनाटकाच्या नाटकाप्रमाणे विनाशाच्या काठावर उभा असलेला संभाजी आपल्या दोषांच्या अभिज्ञानाने आत्मपरिक्षण करतो.'[1] हे नाटकाच्या शेवटी दाखवलेले आहे. संपूर्ण नाटकामध्ये संभाजीराजांची स्वच्छंदी बेजबाबदार आणि रंगेल अशी प्रतिमा चित्रीत केलेली आहे.

राजसन्यांस या नाटकाच्या पहिल्या प्रवेशातच संभाजी आणि तुळशी एकमेकांवर कसे आकर्षक होतात यांचे विलक्षण अदभुतरम्य असे दृश्य गडकऱ्यांनी चितारले आहे. मालवणच्या सिंधदुर्गाच्या बुरूजावर संभाजीराजे , दयीसारंग दौलतराव आणि इतर अधिकारी असतात.समुद्र खवळलेला असतो तशीच दरियातुन आपले जहाज हाकारण्याची राजांना इच्छा असते.अशातच बुरूजाच्या खाली घाटावर दौलतरावाची बायको तुळशी होडीत बसून समुद्रात जाते. होडी उलटते. ती दिसेनाशी होते तेव्हा मंजुळा धावा धावा म्हणून ओरडू लागते. बायकोला वाचविण्यासाठी समुद्रात उडी घ्यायला संभाजीराजे दौलतखानाला सांगतात तो त्यांची बेपरवा करतो. तेव्हा संभाजी राजेच तुळशीला वाचवण्यासाठी समुद्रात उडी घेतात. बुडत असलेल्या तुळशीला संभाजीराजे वाचवितात. आणि मग दोघेही एकमेकांवर आकर्षित होउुन प्रेमसागराच्या लाटावर हेलकावे खात खात बोलू लागतात. तुळशी संभाजीस म्हणते,"आपल्याकडे पाहताना नजीरेची ज्योत पापनीने मालवली.उरीची लाज पदराने पालवली आज जवानमर्दीच्या बादशहाने माझ्या जीवनवंतीला काटेरी भूषने बहाल केली.

सहयाद्रीच्या राजसिंहा सिंधीदुर्गाच्या वाघिणीची आज गाय झाली"[2] तेव्हा संभाजी तुळशीस म्हणतो, "प्यारी मानवलोकीची लग्न रद्द करून रायगडचा राजा आज पुन्हा तुझ्याशी लग्न करत आहे. मस्तकावरून सुटणाऱ्या हया थेंबाची सौंदर्याच्या या मोत्यांची बिनसराची मुंडावर तुझ्या कपाळी शोभते आहे. समोर संध्याकाळचा होम पेटला आहे. तुफान दरियात मरणाचा नेम नसल्यामुळे काळाचा एकच पाश आपल्या दोघांच्या कंठात आहे. त्याचीच लगीनमाळ करून डोंगरलोटच्या बोहल्यावर मावळत्या देवाच्या साक्षीने मरणाचा मुहुर्त साधून रायगडचा राजा मनाच्या मुक्या मंत्राने तुळशी तुझ्याशी लग्न लावीत आहे."[3] अशा प्रकारे तुळशी व संभाजीच्या प्रेमप्रसंगाचे वर्णन नाटकामध्ये चित्रीत केले आहे.

त्यानंतर संभाजीराजे तुळशीला घेऊन तिच्याबरोबर रायगडावर उघडपणे राहू लागतात.एके दिवशी येसूबाई संभाजीला शुध्दीवर आनतात तेव्हा तुळशीला हाकून देतात. दुसरीकडे आपल्या बायकोला रखेती बनवून आपल्या संसाराची राखरांगोळी केल्याबद्दल दौलतराव चिडले. संभाजीचा सुड उगवण्यासाठी मोगलाकडे जात असताना त्याचे वडील साबाजी त्याला भेटतो. आपल्या स्वतःच्या हातानी पुत्रावर वार करतो एवढयात संभाजीराजांनी हाकून दिलेली तुळशी राणी येसूबाईवर कसा सूड घ्यावा याच विचारात असताना नवरा दौलतराव शेवटची घटका मोजीत असताना भेटते. तेव्हा तुळशीचे पतिप्रेम पुन्हा जागृत होते. मराठेशाही मातीला मिळवून मराठयाच्या महाराणीला गाय करिन तुमची प्रतिज्ञा पूर्ण करित असेन वचन मरत असलेल्या दौलरावास देते. पुढे संभाजी मोगलाचे कैदी होतात. मोऱ्याची सेना येसूबाईंना गिरफतार करते. तुळशीची प्रतिज्ञा पूर्ण होते. हर्षोन्मोदाने बेफाम होउन ती राणी येसुबाईच्या पायातल्या सोन्याच्या सारक्या आपल्या पायात घालू लागते.तोच तिचे वडील हिरोजी फर्जद तलवार उपसून तिला एका घावातच ठार करतात. मराठेशाही बेईमान झालेल्या आपल्या पुत्राला व कन्येला स्वतःच्या हातानी कंठस्नान घालणारे सानाजी शिर्के व हिरोजी फर्जेद हे ऐंशी वर्ष वयाचे म्हातारे म्हणजे मराठयांचा इमानाचे आणि त्यागाचे जणू दोन प्रतिके गडकऱ्याने या नाटकात दर्शविले आहे.

राजसन्यांस हे संभाजीचे नाटक असले त्यातील इतर पात्राच्या संहारामागे संभाजीची कर्तव्यभ्रष्टता कशी कारणीभूत आहे हे गडकऱ्यांनी या नाटकात दाखविले आहे.

नाटकाच्या शेवटच्या अंकामध्ये पश्चातापाग्नित जळत असलेला संभाजी चित्रित केला आहे.तुळापूरच्या मोगल छावणीच्या तुरूंगात संभाजीराजे आगदी मरणोन्मुख मनस्थितीत बसले असताना संभाजी राजांना सोडविण्यासाठी आलेल्या साबाजी शिर्केंना उददेशून संभाजी म्हणतो "गोब्राम्हणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज ! नाही साबाजी ही माझी किताबत नाही ! संभाजी हा म्हणजे केवळ रंडीबाज छाकटा ! कशीची गगां आणि रामेश्वराचा सागर एकवटुन छत्रपतीनी बांधिलेल्या राष्ट्रतीर्थाची श्रीगंगासागराची ज्याने व्यभिचाराच्या दिवाणखान्यातली मोरी बनवली तो हा संभाजी ! वैराग्याच्या वेगाने फडफडणाऱ्या भगव्या झेंडयांला दारूबाजाचे तोंड पुसण्याचा हातरूमाल केला ! महाराष्ट्रलक्ष्मीच्या वैभवाचा जरीपतका फाडून त्याची रांडेसाठी काचोळी केली ! साबाजी माझया नऊ वर्षाच्या नावलौकीकाची इमारत नीटपणे पहा ! चिटणीसाला हत्तीच्या पायाखाली तुडवून तिचा पाया घातला. मातोश्री सोयराबाई साहेबांना जितेपणी भिंतीत चिणून तिच्या भिंती उभारल्या, ती पातकी इमारत उंचावता उंचावता कळसाला पोचण्यापूर्वीच कोसळून तिच्या खाली संभाजीचा चुराडा होऊन गेला. साबाजी, मी बाहेर पडून लोकांना काय तोंड दाखवू? आपला राजा सुटला असे पाहाताच , माझी प्रजा आपखुषीने देश सोडून हद्दपार होईल साबाजी या काळोखांत सुध्दा मला तोंड लपवावेसे वाटते खाली पाहीन तर हत्तीच्या पायानी पाताळापर्यंत गाडलेला बाळाजी पुन्हा जमिनीतून वर येईल अशी भिती वाटते भोवताली पाहिले तर कोपऱ्याकोपऱ्यातून आईसाहेबाचे डोळे माझ्याकडे टवकारून पाहतील वर पहिले तर शिरकऱ्याची उडविलेली शिरे आकाशातून जयद्रशाच्या मस्तकाप्रमाणे येऊन माझ्या मस्तकावर आदळतील ! साबाजी मी आता कोणीकडे पाहू ? सहयाद्रीचा सिंह आता अगदी भयभीत झाला आहे.[4]

निष्कर्ष :–

1. गडकऱ्यांनी नाटकामध्ये तुळशी आणि संभाजी काल्पनिक प्रणय कथेचे वर्णन केले आहे.
2. राजसंन्यास नाटकात नाटकाराने संभाजी राजाची रंगेल आणि रगेल प्रतिमा रंगवलेली आहे.
3. नाटकाच्या उत्तरार्धात पश्चातापाच्या अग्निमध्ये जवळ असलेल्या शोकनाच्या नायका प्रमाणे स्वतःच्या दोषांचे आत्मपरिक्षण करताना संभाजीस दाखला आहे.
4. राजसंन्यास नाटकातील संभाजीच्या प्रतिमेस कोणताही ऐतिहासीक पुरवा मिळत नाही.
5. इतिहासाच्या विर्पहास नाटकाराने या नाटकामध्ये केल्याचे दिसून येते.

संदर्भग्रंथ सुची

1. कुलकर्णी भिमराव, संपूर्ण गडकरी *(संपा)*, खंड 1, सरिता प्रकाशन, पुणे नववी आवृत्ती 1984, पृ.क्र.19
2. उपरोक्त पृ.क्र. 294
3. उपरोक्त पृ.क्र. 294
4. उपरोक्त पृ.क्र. 343,344

सोमवंशी गिरीधर नागोराव

सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा.